# साने गुरूजी यांच्या जयंती निमित्त त्यांची थोडी माहिती

मुलांनो,

तुम्ही बलसागर भारत होवो हे गाणे ऐकले आहे ना? खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ही प्रार्थना ऐकली आहे? बरोबर

त्या प्रार्थना कुणी लिहिल्या माहित आहे? त्या लिहिल्या साने गुरुजी यांनी. त्यांची आज जयंती आहे.

**साने गुरुजींचे पुर्ण नाव पांडूरंग सदाशिव माने** असे होतं. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी दापोली, जिल्हा रत्नागिरी येथे झाला. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये ते जास्त परिचित होते म्हणून त्यांना साने गुरुजी म्हणून ओळखलं जात होतं.

तो काळ भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा होता. साने गुरूजीही त्यात मागे नव्हते. *महात्मा गांधींनी सुरू केलेला मिठाचा सत्याग्रह असो वा भारत छोडो आंदोलन असो,* साने गुरुजी यात सक्रिय होते. म्हणूनच इंग्रजांनी त्यांना तुरुंगातही टाकले होते. साने गुरुजी केवळ स्वातंत्र्यसेनानी नव्हते तर ते लेखक आणि समाजसुधारकही होते.

**श्यामची आई गोष्ट** किती जणांना माहित आहे? ही एक तुमच्यासारख्या छोटया मुलाची गोष्ट आहे. **या गोष्टीमध्ये प्रेमाचा, नैतिकतेचा आणि मानवतेचा संदेश आहे.** त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांतून माणुसकी आणि प्रेम हाच खरा धर्म आहे हे सांगणारे साने गुरुजी यासाठी संघर्षही करत होते.

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर सर्वांसाठी खुले असावे यासाठी त्यांनी आमरण उपोषण केले.

साने गुरुजी यांच्या जीवनातून आपल्याला महत्त्वाचा संदेश मिळतो की **माणुसकी आणि प्रेम हाच खरा धर्म आहे.** त्यांनी आपला हाच संदेश एका सुंदर गीतामध्ये गुंफ़ला आहे. साने गुरुजींच्या जयंतीनिमित्त आपण सर्व मिळून साने गुरुजींचा हा संदेश आपल्या मनात साठवू या!